# मेट्रो-३ चे ९५ टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण

## ऐतिहासिक वारसा इमारतींसह समुद्रानजीकच्या आव्हानांवर मात : रणजित सिंह देओल

मुंबई, ता. २२ : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ च्या पॅकेज-१ चे ९६ टक्के भुयारीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे पूर्ण करण्यात आले आहे. या पॅकेज अंतर्गत भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पूर्ण झाला. या कामामुळे मेट्रोचे एकूण ९५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत सहा भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या भुयारीकरणासह पॅकेज-१ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाऊन लाईनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

ऐतिहासिक वारसा इमारती व समुद्रानजीक भुयारीकरण करणे जिकरीचे आहे. मात्र आमचे अभियंते व कामगारांची उत्कृष्ट टीम हे शिवधनुष्य लिलया पेलत आहे. मला आनंद वाटतो की ऐतिहासिक वारसा इमारतीजवळून भुयारीकरण करताना सर्व सुरक्षेविषयी दक्षता घेत, पॅकेज-१ चे आतापर्यंत ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले.